पुढारी

# चेंबूरमध्ये तंबाखू विरोधात जनजागृती!



**मुंबई : वार्ताहर**

लहान वयात धूम्रपान व तंबाखूचे सेवन केल्याने ३० ते ३५ वयोगटात कर्करोग सारखा गंभीर आजार होत असल्याचे आढळून येत आहे. या व्यसनाच्या विरोधात विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून चेंबूर हायस्कुल येथे मंगळवारी जनजागृती मोहीम राबविण्यात आली होती.

जे. व्ही. गोकल चॅरिटी ट्रस्ट, अश्वमेध फाउंडेशन व साक्षी व्हिजन यांच्या संयुक्त विद्यमाने या जनजागृती मोहिमेचे आयोजन केले होते. गोकल चॅरिटी ट्रस्टचे मुख्य कार्यकारी डॉ. उल्हास वसावे यांच्या हस्ते गरीब - गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व शालेयपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी चेंबूर हायस्कुलचे मुख्यध्यापक सदानंद परब, साक्षी व्हिजनचे सचिन गायकवाड, शिल्पा मालदारे, अश्वमेध फाउंडेशनचे प्रकाश पालांडे उपस्थित होते. तर डॉ. उल्हास वसावे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, एमबीबीएसचे शिक्षण घेत असताना वसतिगृहात दर सहा महिन्याला सर्व विद्यार्थ्यांच्या खोली बदली व्हायच्या. रूम पार्टनर मिळायचे ते कोणी धुम्रपान करणारे तर कोणी तंबाखू खाणारे असायचे पण त्यांच्या सोबत राहून मला कधीच व्यसन जडले नाही.

शिवसेनेचे अभय साळुंके यांच्याकडून श्रमदात्यांना अन्नदान

# तगरखेडा येथील महाश्रमदानाची सांगता

प्रतिनिधी

**औराद शहाजानी :** पाणी फाऊंडेशन आयोजित सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा २०१७ निमित्त तगरखेडा ता. निलंगा येथे अखंड ४५ व्या दिवशी श्रमदान करून श्रममहोत्सवाची सांगता करण्यात आली. काल संध्याकाळी ७ ते १० या वेळेत मशाल फेरी काढून व पथनाट्याद्वारे जनजागृती करून श्रमदानाला येण्याची विनंती केली. स्पिकरवरून घोषणा देत श्रमदानाला येण्याचे आवाहन करण्यात आले. गावभर मशाल फेरी काढण्यात आली. या मशाल फेरीला उदंड प्रतिसाद मिळाला. जवळपास २३०० लोक श्रमदान करण्यासाठी उपस्थित झाले. सर्व शिवार माणसांनी फुलून गेले होते. लहान-थोर, युवक, वयस्कर मंडळी श्रमदानासाठी उपस्थित होती. कितीही मार्किंग केली तरी कमी पडत होती. जवळपास २००० घनमीटर बांधबंदिस्तीचे काम श्रमदानातून पूर्ण करण्यात आले. आज स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी विक्रमी काम करण्यात आले. इब्राहिम बागवान व हिना सय्यद यांचे आज सकाळी १० वाजता लग्न लागले. श्रमकऱ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी ते ठिक १०-३० वाजता श्रमदानासाठी उपस्थित झाले. सर्वांसोबत [illegible] नवदाम्पत्याने श्रमदान केले. सकाळी सर्व तगरखेडकर वाजत गाजत श्रमदानासाठी निघाले. गावात उत्साहाचे वातावरण तयार



झाले होते. सकाळीच भजनी मंडळ टाळ-मृदंगाच्या गजरात श्रमकऱ्यांचा उत्साह वाढवित होते. अनेक युवक एकमेकांत स्पर्धा लावून बांधबंदिस्तीचे काम करत होते. बाल मंडळी सर्व श्रमकऱ्यांना पाणी देण्यात मग्न होती. प्रत्येकजण आपापल्या परीने काम करून आपल्या गावासाठी, पाण्यासाठी योगदान देत होती. आज श्रममहोत्सवाचा शेवटचा दिवस असल्यामुळे गोड-धोड जेवणाचे नियोजन करण्यात आले होते. आजचे अन्नदान शिवसेनेचे लातूर जिल्हासंपर्क प्रमुख अभय साळुंके यांच्याकडून पुरी, भाजी, पुलाव, बालुशाई ये स्वादिष्ट जेवण देऊन केले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर श्रमाचा आनंद दिसत होता. मी माझ्या गावासाठी काहीतरी चांगले केले आहे. ही भावना अनेकांनी बोलून दाखविली. तगरखेड्यात जलसंधारण, मृदसंधारणाबरोबरच मनसंधारण या निमित्ताने झाले आहे.